# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## ४७ वा वार्षिक
## दीक्षान्त समारंभ

शनिवार, दि. १२ मार्च, २०११



## मा. प्रा. (डॉ.) ना. ज. पवार

कुलगुरु , शिवाजी विद्यापीठ

## यांनी सादर केलेला अहवाल

# 47 वा दीक्षान्त समारंभ


## प्रा. डॉ. एन्.जे. पवार,

कुलगुरू,

शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर


यांनी सादर केलेला अहवाल

आजच्या पदवी प्रदान समारंभाचे प्रमुख पाहुणे व महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री मा. नामदार श्री पृथ्वीराजजी चव्हाण, आजच्या दीक्षान्त समारंभात ज्यांना सन्माननीय डी. लिट. पदवी देण्यात आलेली आहे ते आदरणीय क्रांतिअग्रणी जी. डी. बापू लाड, उपस्थित मान्यवर, विविध विद्याशाखांचे अधिष्ठाता, अधिसभा, विद्या परिषद व व्यवस्थापन परिषदेचे सदस्य, नूतन पदवीधर, इतर विद्यार्थी, माध्यमांचे प्रतिनिधी आणि मित्रहो,

आरंभीच 47 व्या दीक्षान्त समारंभात पदवी व पदविका प्राप्त केलेल्या सर्व स्नातकांचे मी मन:पूर्वक अभिनंदन करतो आणि त्यांच्या पुढील यशस्वी वाटचालीस शुभेच्छा देतो. आता मी गेल्या वर्षातील महत्त्वपूर्ण घडामोडींचा अहवाल सादर करीत आहे. मला सांगण्यास आनंद वाटतो की, फुले, आंबेडकर व शाहूंच्या विचारांचा वसा व वारसा जपणाऱ्या शिवाजी विद्यापीठाचे लवकरच सुवर्ण महोत्सवी वर्षामध्ये पदार्पण होत आहे. गेल्या 50 वर्षांमध्ये काळानुरूप बदलास तोंड देत जागतिकीकरणाच्या आव्हानांना सामोरे जाताना आपले विद्यार्थी कुठेही कमी पडू नयेत यासाठी अनेक महत्त्वपूर्ण योजना अंमलात आणलेल्या आहेत. त्यामध्ये व्यावसायिक आणि रोजगारभिमुख शिक्षण देण्यावर भर देण्यात आला आहे. ही परंपरा अशीच पुढे चालू राहण्यासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न करून विद्यापीठाची वाटचाल सुरू आहे. सातारा, सांगली आणि कोल्हापूर हे तीन जिल्हे विद्यापीठाचे कार्यक्षेत्र असून 261 महाविद्यालये व 13 संशोधन संस्था विद्यापीठाशी संलग्नित आहेत. तसेच विद्यापीठात सुमारे 36 अधिविभाग कार्यरत आहेत.

आजअखेर विद्यापीठाने विविध राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय संस्थांशी व विद्यापीठांशी केलेल्या सामंजस्य करारास अनुसरून अध्यापन व संशोधन कार्य यशस्वीपणे सुरू आहे. याचीच फलश्रुती म्हणून शिवाजी विद्यापीठात सुरू असणाऱ्या संशोधनाची दखल केंद्र शासनाच्या डिपार्टमेंट ऑफ सायन्स ॲण्ड टेक्नॉलॉजी, नवी दिल्ली या संस्थेने घेवून विद्यापीठास "Promotion of University Research and Scientific Excellence" (PURSE) अंतर्गत 9 कोटी रूपयांचे अनुदान नुकतेच मंजूर केले आहे. या स्वरूपाचे अनुदान मिळविणाऱ्या देशभरातील 29 विद्यापीठांमध्ये आपल्या विद्यापीठाचा समावेश झाला आहे. पदार्थविज्ञान अधिविभागास डी.एस.ए. योजनेअंतर्गत 95 लाखांचे अनुदान मिळाले आहे.

विविध अधिविभागांमध्ये बृहत संशोधन प्रकल्प (Major Research Projects) याद्वारे संशोधनाचे काम अतिशय चांगल्या पद्धतीने सुरू आहे. गतवर्षात 12 बृहत संशोधन प्रकल्पांसाठी दोन कोटींचे अनुदान मंजूर झाले. विद्यापीठ अनुदान आयोग व इतर वित्तीय संस्थांकडून विविध प्रकल्प राबविण्याकरिता विद्यापीठास भरघोस अनुदान प्राप्त झाले. विद्यापीठामध्ये कार्यरत असणाऱ्या शिक्षकांना विविध आंतरराष्ट्रीय शिष्यवृत्त्या प्राप्त झाल्या. विद्यापीठ अधिविभागातील काही प्राध्यापकांनी कोरिया येथील हनयांग युनिव्हर्सिटीमध्ये अभ्यागत प्राध्यापक म्हणून भेट दिलेली आहे. तसेच यु.एस.ए., जपान, फ्रान्स व कोरिया येथील संशोधकांनी शिवाजी विद्यापीठास भेट देऊन येथील प्राध्यापकांशी संशोधनाविषयी चर्चा केली आहे. विद्यापीठात Biodiversity Park व Energy Park स्थापन करण्यासाठी शासनाकडे प्रस्ताव सादर केले आहेत. त्यास सकारात्मक प्रतिसाद लाभला असून मा. पालक मंत्रीमहोदयांनी नुकतेच 20 लाख रूपयांचे अनुदान विद्यापीठास दिले आहे. विद्यापीठाच्या डॉ.बाबासाहेब आंबेडकर संशोधन विकास केंद्रास स्पर्धा परीक्षा पूर्व मार्गदर्शन केंद्रासाठी 20 लाख रूपयांचा निधी मंजूर झाला आहे. शाहू संशोधन केंद्राच्या वतीने राजर्षी शाहू साहित्यमालेअंतर्गत दिवाणबहादूर करवीररत्न प्रोफेसर आण्णासाहेब बाबाजी लठ्ठेकृत: श्रीमच्छत्रपती शाहू महाराज यांचे चरित्र, कै. वा. आ. लाटकरशास्त्रीकृत "श्रीशाहूचरितम (संस्कृत) : श्रीशाहूंचे चरित्र (मराठी)" हे ग्रंथ प्रकाशित करण्यात आले.

विद्यापीठ व संलग्न महाविद्यालयांमध्ये गतवर्षात अनेक चर्चासत्रांचे, कार्यशाळांचे व व्याख्यानमालांचे आयोजन करण्यात आले. यामधील काही उल्लेखनीय चर्चासत्रे पुढीलप्रमाणे:

गांधी अभ्यास केंद्राच्या वतीने "Making of the Mahatma : M.K.Gandhi in South Africa" या आंतरराष्ट्रीय चर्चासत्राचे आयोजन केले आहे. राज्यशास्त्र अधिविभागाच्या वतीने "Samyukta Maharashtra –Myth and Reality" या विषयावर एकदिवसीय राष्ट्रीय चर्चासत्र आयोजित करण्यात आले होते. पदार्थविज्ञान अधिविभागाच्या वतीने National Conference on Physics of Materials and Materials based Device Fabrication-2011 या परिषदेचे आयोजन करण्यात आले होते. University Industry Interaction Cell, AIU व Confederation of Indian Industries, New Delhi यांच्या संयुक्त विद्यमाने University Industry Council Symposium चे आयोजन करण्यात आले होते. तसेच वनस्पतीशास्त्र अधिविभागाच्या वतीने 33rd IBS Conference and International Symposium on "The New Horizons of Botany" चे आयोजन यशस्वीपणे करण्यात आले.

बंगळूरच्या बायोस्पेक्ट्रम मासिकामध्ये सर्वेक्षण केल्यानुसार विद्यापीठातील बायोटेक्नॉलॉजी अधिविभागाचा भारतातील टॉप–20 विभागामध्ये समावेश केला आहे. CURRENT SCIENCE या जर्नलमधील लेखामध्ये पी इंडेक्स आणि H Index 37 नुसार शिवाजी विद्यापीठास राष्ट्रीय पातळीवर 26 वे मानांकन मिळाले आहे. SCIENCE DIRECT या जर्नलचा पूर्ण ॲक्सेस मिळण्यासाठी भारतातील निवडक 60 विद्यापीठांमध्ये शिवाजी विद्यापीठाचाही समावेश करण्यात आला आहे. विद्यापीठाच्या काही शिक्षकांना राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावरील मानाच्या फेलोशिप्स सुध्दा मिळाल्या आहेत.

महाविद्यालयीन पातळीवर देखील संशोधनास चालना मिळावी म्हणून विशेष मोहीम घेवून कार्यशाळा राबविण्यात आल्या. अग्रणी महाविद्यालयाच्या (Lead College) माध्यमातून जिल्हावार संशोधनात्मक शिबिरे आयोजित करण्यात आली. यामध्ये विविध शाखांच्या शिक्षकांना संशोधन प्रकल्प सादर करण्यासाठी मार्गदर्शन करण्यात आले.

महाविद्यालयांना नॅकद्वारे मानांकन घेण्यासाठी प्रोत्साहन देण्यात येत आहे. गतवर्षी शिवाजी विद्यापीठाशी संलग्नित पाच महाविद्यालयांना 'अ' दर्जा मिळाला आहे. ती महाविद्यालये पुढीलप्रमाणे– छत्रपती शाहू इन्स्टिटयूट ऑफ बिझनेस एज्युकेशन अॅण्ड रिसर्च, ट्रस्ट कॉलेज ऑफ नॉन कन्व्हेन्शनल व्होकेशनल कोर्सेस फॉर वुमन, कोल्हापूर, छत्रपती शाहू इन्स्टि. ऑफ बिझनेस एज्युकेशन अॅण्ड

रिसर्च, कोल्हापूर, सद्गुरू गाडगे महाराज कॉलेज, कराड यशवंतराव चव्हाण इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स, सातारा आणि धनंजयराव गाडगीळ कॉलेज ऑफ कॉमर्स, सातारा. पुनर्मूल्यांकनामध्ये आजतागायत सहा महाविद्यालयांना अ मानांकन मिळविण्यात यश प्राप्त झाले आहे. तसेच INSPIRE Programme या योजनेद्वारे दूधसाखर महाविद्यालय, बिद्री या महाविद्यालयास विशेष अनुदान मिळाले आहे.

National Knowledge Network (NKN) च्या माध्यमातून विद्यार्थी, प्राध्यापक व संशोधकांचे ज्ञान अद्ययावत करण्याचा प्रयत्न आहे. या योजनेअंतर्गत कोल्हापूर, सांगली व सातारा या जिल्ह्यातील 70% हून जास्त महाविद्यालये Broadband BSNL ने जोडली आहेत. यावर्षी विद्यापीठामध्ये उपलब्ध असणाऱ्या Satellite Interactive Terminal च्या माध्यमातून राजस्थान केंद्रीय विद्यापीठ, किसनगड येथील विद्यार्थ्यांना व्याख्याने देण्यात आली. विद्यापीठ अनुदान आयोगाने सूचित केल्याप्रमाणे पदवी पातळीवर सत्रपध्दतीचा अवलंब करण्यात येत आहे. क्रेडीट सिस्टीम सध्या विद्यापीठाच्या विविध विभागांमध्ये चालू आहे. ही पध्दती आता महाविद्यालयीन पातळीवर राबविण्याचा विद्यापीठाचा मनोदय आहे.

विद्यार्थी हा केंद्रबिंदू मानून विद्यापीठामध्ये गरीब, होतकरू व हुशार विद्यार्थ्यांना शिक्षण घेण्यासाठी नेहमीच प्रोत्साहन देण्यात येत आहे. शिवाजी विद्यापीठाचा 'कमवा आणि शिका' हा अभिनव उपक्रम बऱ्याच विद्यार्थ्यांना लाभदायक ठरत असून या योजनेअंतर्गत शिक्षण घेतलेले बरेच विद्यार्थी उच्च पदावर काम करीत आहेत. गतवर्षात विद्यापीठ व विविध महाविद्यालयांतील गुणवंत विद्यार्थ्यांसाठी सुमारे 23 लाख रूपयांच्या शिष्यवृत्ती प्रदान करण्यात आल्या. विविध पारितोषिकांसाठी यावर्षी देणगीदारांकडून 8 लाख रूपये इतकी देणगी विद्यापीठास प्राप्त झालेली आहे. उल्लेखनीय बाब म्हणजे नुकतीच एका सेवानिवृत्त मुख्याध्यापकांनी विद्यापीठास पाच लाख रूपये इतकी भरघोस देणगी सुपूर्त केली आहे.

शिवाजी विद्यापीठाच्या वतीने राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्य प्रभावीपणे चालू आहे. या योजनेअंतर्गत महाविद्यालयांमध्ये विशेष श्रमसंस्कार शिबिरांचे आयोजन करण्यात आले. विद्यापीठ परिसरात तीन महाविद्यालयातील 175 विद्यार्थ्यांचे विशेष श्रमसंस्कार शिबीर संपन्न झाले. मुधोजी महाविद्यालय, फलटण येथे राज्यस्तरीय विशेष श्रमसंस्कार शिबीर संपन्न झाले. यामध्ये 430

विद्यार्थी सहभागी झाले होते. गतवर्षी तीन विभागीय युवा महोत्सव तसेच विवेकानंद महाविद्यालय, कोल्हापूर येथे मध्यवर्ती युवा महोत्सव संपन्न झाला. इंद्रधनुष्य युवा महोत्सवामध्ये विद्यापीठाच्या विद्यार्थ्यांनी विविध 8 स्पर्धांमध्ये क्रमांक मिळविला. तसेच पश्चिम विभागीय युवा महोत्सवामध्ये विद्यापीठाच्या विद्यार्थ्यांनी दोन स्पर्धांमध्ये क्रमांक मिळविला.

कोलकाता येथे नुकत्याच संपन्न झालेल्या अखिल भारतीय आंतर विद्यापीठ जलतरण स्पर्धेमध्ये श्री वीरधवल खाडे याने सात सुवर्णपदके मिळवून तीन नवीन विक्रम प्रस्थापित केले. विविध खेळ प्रकारांमध्ये विद्यापीठाच्या खेळाडूंनी 7 सुवर्ण, 4 रौप्य व 13 कांस्य पदके मिळविली आहेत. तसेच डॉ. पंजाबराव कृषी विद्यापीठ अकोला येथे संपन्न झालेल्या अश्वमेध स्पर्धेमध्ये विद्यापीठाच्या खेळाडूंना 10 सुवर्ण, 11 रौप्य व 7 कांस्य अशी 28 पदके मिळाली. या क्षेत्रातील विद्यार्थ्यांचे यश लक्षात घेवून विद्यापीठाच्या परिसरात अद्ययावत क्रीडा संकुल विकसित करण्याचा प्रयत्न केला जाणार आहे.

विद्यापीठ अधिविभागात शिक्षण घेणाऱ्या मागासवर्गीय विद्यार्थ्यांसाठी रेमिडियल कोचिंग स्कीम तसेच सेट-नेट या परीक्षेसाठी विशेष मार्गदर्शन शिबिरांचे आयोजन केले जाते. गतवर्षात सेट-नेट या परीक्षेत विविध विभागातील 80 विद्यार्थ्यांनी यश संपादन केले आहे.

यु.जी.सी. कडून 22 लाखांचे अनुदान प्लेसमेंट सेलसाठी मंजूर झाले असून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्याचे काम सुरू आहे. गतवर्षात विद्यार्थ्यांना रोजगाराच्या विविध संधी प्राप्त व्हाव्यात म्हणून विविध कॅम्पस इंटरव्हयूचे आयोजन करण्यात आले होते. इन्फोसिस बीपीओ लि., पुणे येथे 15 महाविद्यालयातील 35 प्राध्यापकांनी प्रशिक्षण घेतले.

विद्यापीठाच्या प्रशासनात मोठी सक्षमता आणण्याचा प्रयत्न सुरू आहे. त्यास अधिक गतिमानता आणण्यासाठी विविध योजना कार्यान्वित करण्यात आल्या आहेत. गतवर्षात पदव्युत्तर अधिविभागांमध्ये 26 शिक्षकांची नियुक्ती करण्यात आली. शिक्षकेतर पदांच्या आढाव्यानंतर शिवाजी विद्यापीठाची 217 पदे कमी झाल्याचा परिणाम विद्यापीठाच्या प्रशासनावर अतिरिक्त ताणाच्या स्वरूपात दिसतो आहे. तरीदेखील विद्यापीठाचे सर्व सेवक त्यांच्या क्षमतेपलीकडे जाऊन कार्यक्षम प्रशासनाची परंपरा जोपासत आहेत. गेल्या वर्षभरामध्ये विविध अधिकार मंडळांच्या निवडणुका

अत्यंत चांगल्या पद्धतीने प्रशासनाने पार पाडल्या आहेत. विद्यापीठ वर्धापन दिनानिमित्त गुणवंत शिक्षक व गुणवंत कर्मचारी व यश संपादन केलेल्या पाल्यांना गौरविण्यात आले.

संलग्नता विभागाचे संगणकीकरण करण्याचे काम सुरू आहे. विद्यापीठ अधिविभागांमध्ये परीक्षा अर्ज, निकाल व विविध परिपत्रके विद्यापीठ वेबसाईटवरून प्रसिध्द करीत आहोत. Digital College - Digital University ही संकल्पना सुरू करण्यात आली असून गतवर्षी 13 परीक्षा DCDU योजनेनुसार घेण्यात आल्या असून सुमारे 80,000 विद्यार्थ्यांनी यशस्वीरित्या परीक्षा दिल्या. याही वर्षी विद्यापीठाच्या विविध परीक्षांचे निकाल वेळेत जाहीर करण्याची आपली परंपरा अबाधित राहिली आहे.

UGC Infonet E-journals Consortium या राष्ट्रीय स्तरावरील योजनेअंतर्गत शिवाजी विद्यापीठास एकूण 25 नामांकित परदेशी प्रकाशकांची 5500 हून अधिक नियतकालिके उपलब्ध झालेली आहेत.

विद्यापीठामध्ये तंत्रज्ञान अधिविभागाचे विस्तारीकरण करण्यात येत असून तेथील विद्यार्थ्यांसाठी वसतिगृहाचे बांधकाम पूर्ण झाले आहे. तंत्रज्ञान अधिविभागातर्फे सुरू असलेल्या सर्व अभ्यासक्रमांना ए.आय.सी.टी.ई. यांची मान्यता मिळालेली आहे. दूरशिक्षण विभागासाठी स्वतंत्र इमारत बांधण्यात आलेली असून दूरशिक्षण माध्यमाद्वारे दरवर्षी सुमारे 42, 000 विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. विद्यापीठामध्ये विविध अध्यासने व अभ्यासकेंद्रे कार्यक्षमपणे सुरू आहेत. यावर्षी विद्यापीठाने एम.ए. जैनॉलॉजी हा नवीन अभ्यासक्रम सुरू केला आहे.

विद्यापीठाच्या सुवर्णमहोत्सवाच्या अनुषंगाने विविध संस्थांकडे प्रस्ताव पाठविण्यात आले आहेत. या प्रस्तावांमध्ये प्रामुख्याने Centre for Nano Science, Centre for Geoscience and Disaster Management, Centre for Youth Development, Centre for Languages, Centre for Studies in Modelling and Forecasting, Centre for Sustainable Development and Social Justice, Inter-University Centre for Rural Development इत्यादींचा समावेश आहे. राजर्षी शाहूंच्या कार्याची दखल घेवून शाहू संशोधन केंद्राच्या सक्षमीकरणाचा प्रस्तावही त्यात समाविष्ट आहे. विद्यापीठामध्ये सुवर्णमहोत्सवी वर्षानिमित्त विद्यार्थ्यांना संशोधनास प्रोत्साहन देण्यासाठी

Golden Jubilee Research Fellowship सुरू करण्याचा मानस आहे. तसेच कमकुवत महाविद्यालयांचे सबलीकरण करण्यासाठी सुध्दा भर दिला जाणार आहे. या सर्व बाबींसाठी शासनाचे सहकार्य अपेक्षित आहे. हे वर्ष महाराष्ट्र राज्याचे सुवर्णमहोत्सवी वर्ष आहे. लवकरच आपण शिवाजी विद्यापीठाचाही सुवर्णमहोत्सव साजरा करणार आहोत. आपल्या विद्यापीठाच्या स्थापनेत ज्यांचा सिंहाचा वाटा आहे ते बाळासाहेब देसाई यांचे हे जन्मशताब्दी वर्ष आहे. या क्षणी त्यांची व स्व. यशवंतरावजी चव्हाण यांची आठवण होणे क्रमप्राप्त आहे. या पार्श्वभूमीवर आपल्या विद्यापीठात मा. नामदार श्री पृथ्वीराजजी चव्हाण यांचे आजच्या समारंभाचे प्रमुख पाहुणे या नात्याने स्वागत करताना मला मनस्वी आनंद होतो. यानंतर त्यांचा थोडक्यात परिचय करून देणे हे माझे कर्तव्य ठरते. अभिमानास्पद बाब म्हणजे मा. नामदार चव्हाण हे आपल्या पश्चिम महाराष्ट्राचे भूमिपुत्र आहेत. माजी केंद्रीय मंत्री आनंदराव चव्हाण आणि श्रीमती प्रेमलाकाकी चव्हाण यांचा राजकीय वारसा त्यांना लाभलेला असून अलीकडेच त्यांनी महाराष्ट्राच्या मुख्यमंत्रीपदाची धुरा स्वीकारली आहे. त्यापूर्वी त्यांनी केंद्र शासनात अनेक महत्वाची आणि जबाबदारीची पदे भूषविली आहेत. पंतप्रधान कार्यालयाचे मंत्री म्हणून त्यांनी दाखविलेली प्रशासन क्षेत्रातील त्यांची कार्यक्षमता लक्षात घेऊनच त्यांच्यावर मुख्यमंत्री पदाची जबाबदारी सोपविण्यात आली आहे. त्यांचे शिक्षण BITS Pilani, Rajasthan आणि कॅलिफोर्निया येथील नामांकित विद्यापीठातून झाले. उच्च शिक्षण घेतल्यानंतर त्यांनी अभियांत्रिकी व तंत्रज्ञान क्षेत्रात आपल्या कर्तृत्वाचा ठसा उमटविला.

1973 पासून त्यांनी राजकीय क्षेत्रातही आपले कर्तृत्व सिध्द केले आहे. लोकसभा सदस्य, राज्यमंत्री या नात्याने त्यांनी केलेले कार्य मोलाचे आहे. तसेच राष्ट्रीय पातळीवरील अनेक शासकीय समित्यांवरही त्यांनी उल्लेखनीय कार्य केले आहे.

मा. नामदार चव्हाण यांना सामाजिक कार्य आणि सांस्कृतिक उपक्रमांचीही आवड असून अनेक प्रकारच्या मैदानी खेळांना प्रोत्साहन देण्यासाठी त्यांनी भरीव कामगिरी केली आहे. बुध्दिबळ आणि वाचन हे त्यांचे आवडते छंद आहेत. तसेच त्यांनी अमेरिका, जपान, फ्रान्स, इंग्लंड, जर्मनी इ. अनेक देशांचे दौरे केले आहेत. या परदेश दौऱ्यांमुळे त्यांचे व्यक्तिमत्व अधिकच अनुभवसमृध्द झाले आहे. असे हे कर्तृत्ववान आणि अनुभवसमृध्द व्यक्तिमत्व आपल्या आजच्या पदवी प्रदान समारंभासाठी लाभले आहे हे आमचे अहोभाग्य आहे.

शिवाजी विद्यापीठाच्या 47 व्या पदवी प्रदान समारंभात ज्येष्ठ स्वातंत्र्यसेनानी क्रांतिअग्रणी जी.डी. बापू लाड यांना विद्यापीठाची सर्वोच्च सन्मानाची अशी डी.लिट. ही पदवी प्रदान करताना आम्हांस अत्यानंद होत आहे. भारतीय स्वातंत्र्य लढ्यातील बापूंचे कार्य हे फार मौलिक स्वरूपाचे ठरले आहे. क्रांतिसिंह नाना पाटील व त्यांच्या सहकाऱ्यांच्या सहाय्याने बापूंनी सातारा परिसरात 1942 चा अभूतपूर्व लढा उभा केला. प्रतिसरकारच्या या चळवळीत तुफान सेनेचे फील्ड मार्शल म्हणून त्यांनी केलेले कार्य हे असामान्य स्वरूपाचे आहे. प्रतिसरकारच्या चळवळीबरोबरच त्यांचा गोवा मुक्ती आंदोलन व रझाकारविरोधी चळवळीतही सक्रिय असा सहभाग होता. स्वातंत्र्योत्तर काळातही ते नेहमीच समाजकारणात सक्रीय आहेत. समताधिष्ठित, शोषणविरहित समाज अस्तित्वात यावा या स्वप्नासाठी त्यांची निरंतर वाटचाल सुरूच आहे. गेल्या चार दशकात त्यांनी वंचितांचे अनेक लढे उभे केले आहेत. भारतीय स्वातंत्र्य लढ्यातील त्यांचा सक्रीय सहभाग तसेच सहकार, शिक्षण व उद्योग या सामाजिक क्षेत्रातील असामान्य कार्याबद्दल त्यांना डी.लिट. ही पदवी प्रदान करताना आम्हाला आनंद होतो आहे.

मित्रहो, पुन्हा एकदा आपणा सर्वांचे मन:पूर्वक स्वागत करून मी माझे अहवाल वाचन पूर्ण करतो आणि आजच्या पदवी प्रदान समारंभाचे प्रमुख पाहुणे मा. नामदार श्री पृथ्वीराजजी चव्हाण यांना विनंती करतो की, त्यांनी आपले दीक्षान्त भाषण करावे.

❒❒❒

प्रकाशक : कुलसचिव शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर-४१६ ००४.

मुद्रक : शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर-४१६ ००४